जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ.४/२०१६/ 4578
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे- ४११ ००१.
दिनांक :१८/०७/२०१६

प्रति,

**संस्थाचालक,**
**सर्व शासनमान्य वाणिज्य टंकलेखन/लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

विषय :- <u>शासकीय वाणिज्य टंकलेखन/लघुलेखन अभ्यासक्रमास मुदतवाढ देण्याबाबत...</u>

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. एसपीई-१०१२/(१०८/१२)/साशि-१, दि. ३१ऑक्टोबर २०१३
२. शासन शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११६/एसडी-२, दि. ३० सप्टेंबर २०१५
३. या कार्यालयाचे पत्र क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/आ.४/२०१६/४१५३,दि.२२/०६/२०१६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वाणिज्य टंकलेखन अभ्यासक्रमास शासन शुध्दीपत्र क्र. शासन शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११६/एसडी-२, दि. ३० सप्टेंबर २०१५ नुसार वाणिज्य टंकलेखन अभ्यासक्रमास दि. ३१ मे २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

शासन शुध्दीपत्र क्र. संकीर्ण -२०१५/प्र.क्र.११६/एसडी-२,दि. १३ जुलै २०१६ नुसार सदर अभ्यासक्रमास ३१ मे २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढ अंतिम असून यापुढे मुदतवाढ मिळणार नाही असे प्रतिज्ञापत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडे सादर करण्यात यावेत. सोबत प्रतिज्ञापत्राचा नमूना जोडला आहे. त्यानुसार मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयासाठी विद्यार्थ्यांना दि. २० जुलै २०१६ ते १९ ऑगस्ट २०१६ या कालावधीत प्रवेश देण्यात यावेत. दि. ४ ऑगस्ट २०१६ ते १९ ऑगस्ट २०१६ या कालावधीत परिषदेच्या संकेतस्थळावर या विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरावी. माहिती भरण्यास मुदतवाढ मिळणार नाही.

संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संस्थेच्या जनरल रजिस्टरप्रमाणे नोंदविणे आवश्यक आहे. यासाठी स्वंतत्र जनरल रजिस्टर ठेवण्यात यावे. प्रवेशित झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन भरण्याकरीता दि. ३ ऑगस्ट २०१६ पासून लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदन पत्रे भरण्याचा स्वतंत्र कालावधी दिला जाईल. दि. १९ ऑगस्ट २०१६ पर्यंत परिषदेच्या संकेतस्थळावर माहिती भरलेल्या विद्यार्थ्यांनाच फक्त परीक्षेस बसता येईल याची संस्थांनी नोंद घ्यावी.

(आर.व्ही.गोधने)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

E:\s\letter\mantralay patra.doc

# प्रतिज्ञापत्र

मी श्री.------------------------------------प्राचार्य/ संस्थाचालक------------------------

टंकलेखन संस्था, कोड नं.---------------------------ता.---------------जि-------------प्रतिज्ञापूर्वक

लिहून देतो की , शासन शुध्दीपत्र क्रमांक संकिर्ण -२०१५/प्र.क्र.११६/एसडी-२,दि. १३ जुलै २०१६ अन्वये वाणिज्य टंकलेखन अभ्यासक्रमास ३१ मे २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ अंतीम आहे. याची मला पूर्ण जाणीव आहे यापुढे वाणिज्य टंकलेखन अभ्यासक्रमास मुदतवाढ मागणार नाही. असे प्रतिज्ञापूर्वक लिहून देत आहे.

ठिकाण : -------------

प्रतिज्ञापत्र लिहून देणाऱ्याची सही:

दिनांक : --------------

प्रतिज्ञापत्र लिहून देण्याऱ्याचे नाव :

E:\s\letter\Patra.doc